८३
काव्य.

न. ८३ 83 म. ग्रं. सं. ठाणें

विषय
काव्य

संग्रहालय क्रमांक
८८८
९८५

लेखक शि. बा. निलसुरे

सन १८८२

पुस्तकाचें नांव विद्याधन प्रशंसा

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

ठाणे

# विद्याधनप्रशंसा.

मनोरंजक प्राकृत कविता.

शिवराम रामकृष्ण नित्सुरे.

स्कूलमास्तर शाळा डोंगरी बेट मुंबई.

ह्यांनीं रचून प्रसिद्ध केली.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० १३७
ठाणें सन १८९८

## आर्या.

काव्य करावें म्यां नच वचकावें दूषितो परि लघूस. ॥
कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ॥ १ ॥

मोरोपंत.

( हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें आहे. )

मुंबई.

गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत एग्झिक्युटरस् यांच्या
हुकुमावरून ना० कृ० दुमाळे यांणीं छापिलें.

शके १७९४ अंगिरानाम संवत्सरे.

किंमत आठ आणे.

# PREFACE.

The encouragement, recently given to the vernacular literature by the appointment of a revising Committee and the kind patronage, which Government extends to every literary work of merit, have stimulated the publication of several vernacular works, prose as well as poetical. There have consequently appeared several poems in Marathi, some of which have not only gained popularity but also have proved valuable additions to the Marathi literature. This humble work cannot be presumed to have any claim either to popularity or to a position in the existing standard vernacular literature; yet it is hoped it will not prove entirely uninteresting to the readers of Marathi poems.

The story is based on a didactic legend which the author met with in an old "Bakhar" in the course of his early reading. Some three years back it was, that the poem which now appears before the public was composed and prepared for the press; but the failing health of the author and other difficulties, which unexpectedly arose prevented his giving it then to the public. The author is fully conscious of the fact that some of the incidents in the poem (as, for instance, the burning of the town by the rank poison of the serpent) are improbable and offensive to modern taste; but these he could not avoid, as the spirit of the old Bakhar would have been marred by his attempting to adapt the story to the prevailing taste of the refined public. He has, however, tried his best to remove such improbabilities as far as possible and has inserted several new pieces and carefully revised others. The work nevertheless, may still contain some blemishes, which may have escaped the author's notice; for these he begs the public to be excused, this being his first attempt to appear before them. To conclude, the object which the author has in veiw in this humble attempt is to please; how far he has succeeded in accomplishing it, it remains with the public to decide.

*Bombay,*
*April* 1872.

**S. R. NITSURE.**

Presented to the M. G. S. by
H. B. Vadhavkar
वा. क्र. ८९

# प्रस्तावना.

आलीकडे मराठी भाषेंत पद्यात्मक नवीन ग्रंथांचा बराच प्रसार होत चालला आहे, व ते ग्रंथ वाचण्याची अभिरुचिही पुष्कळांस लागली आहे; ह्यावरून आपणही एक अशा प्रकारचा लहानसा ग्रंथ तयार करून रसिक जनांपुढें ठेवावा, अशी माझ्या मनांत फार उत्कंठा उत्पन्न झाल्यामुळें तो उद्योग मीं हातीं धरिला; व तो ईश्वर कृपेनें तडीसही गेला.

ह्यां कामांत आपण कोणता विषय घ्यावा, अशा योजनेंत असतां मला एका जुन्या बखरींत वाचलेल्या एका बोधपर गोष्टीचें स्मरण झालें. मग मीं तीच हातीं धरिली. ह्या गोष्टीचा कांहीं भाग असंभवनीय असल्यामुळें आलीकडील विद्वज्जनांच्या विचारांस तो अगदीं रुचण्यासारखा नाहीं खरा, पण जीस पुराणाचा कांहीं आधार दिसतो अशा गोष्टीच्या मुळांत फेरफार करणें मला बरें दिसलें नाहीं; ह्मणून मी तिचेंच सूत्र हातांत धरून यथामति रचना केली आहे; ह्या करितां आमच्या प्रिय वाचकांनीं, गोष्टीकडे फारसें लक्ष्य न देतां, तिच्या तात्पर्याकडे व कवितेच्या रचनेकडेमात्र लक्ष्य द्यावें; अशी माझी त्यांस विनंती आहे.

पहिल्यानें माझ्या मनांत ही सर्व कविता एकाच छंदानें करावी असें होतें; पण वृत्तवैचित्र्याच्या योगानें ती वाचकांस अमळ अधिक रुचिकर लागेल, व आपलेसारखे नवशिक्यास निरनिराळीं वृत्तें साधण्याचा यत्न करण्यांत पुष्कळ फायदा होईल असें मनांत आणून मीं आपला पहिला बेत सोडून दिला; आणि निरनिराळीं जीं जीं वृत्तें मला बरीं वाटलीं, तीं तीं घेऊन रचना केली आहे.

ह्या कवितेच्या भाषेची सरणी सर्वत्र एक सारखी आली नाहीं; ह्याचें मुख्य कारण असें कीं, ही कविता सुमारें तीन वर्षांपूर्वीच बहुतेक तयार झाली होती; पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व दुसऱ्या अडचणींमुळें ती छापण्यास तेव्हां सवड झाली नाहीं. हल्लीं त्याच

कवितेंत कांहीं फेरफार करून, व मधून मधून कांहीं पद्यें नवीन घालून, ती शेवटास नेली.

प्रिय वाचकहो, तुह्मांपुढें येण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे; व मीं हातीं धरलेलें कामही फार सोपें आहे असें नाहीं; ह्याज करितां ह्या कवितेंत जे हरएक प्रकारचे दोष असतील, त्यांची क्षमा करून, आपणांपुढें ठेविलेल्या पुस्तकाचा आदरानें स्वीकार कराल, तर माझे श्रमाचा परिहार होईल.

मुंबई.
तारीख २५ अप्रील सन १८७२. } शिवराम रामकृष्ण नित्सुरे.

# कथाभागाचा सारांश.

पूर्वी विजयपूर नामक नगरांत परमानंद ह्मणून राजा राज्य करीत असे. त्याला दुर्जय ह्मणून एक मुलगा होता. ह्या राजपुत्राचें मन विद्येवर मुळींच नसून निरंतर खेळाकडे लागलेलें असे; त्यामुळें तो दुराचरणी झाला. परमानंदानें पुत्रास नानाप्रकारें बोध केला, पण तो सगळा व्यर्थ गेला. त्याचा स्वभाव पालटेना. शेवटीं निरुपाय होऊन त्या राजानें आपलें राज्य कांहीं दिवस प्रधानाचे हवालीं करून, घोर वनांत जाऊन श्रीभवानीची आराधना केली. ती प्रसन्न होऊन राजास ह्मणाली कीं, मी तुझे घरीं पक्ष्याचे रूपानें येऊन तुझ्या पुत्रास बोध करीन. त्याप्रमाणें त्या देवीनें राजाकडे जाऊन, मनुष्य वाणीनें त्या राजपुत्रास पुष्कळ बोधपर, गोष्टी सांगितल्या. त्यांपैकींच ही पुढील एक आहे. देवी दुर्जयास ह्मणते, हे राजपुत्रा, तुझा बाप वृद्ध झाला आहे, व तूं तर अष्टौप्रहर दुराचरणामध्यें निमग्न होऊन विद्येंत व राज्यकारभारांत मुळींच मन घालीत नाहींस; तर आतां तुझें राज्य थोड्या दिवसांत अनायासें शत्रूंच्या हातीं लागणार; ह्याचा विचार कर. तूं ह्मणशील कीं, आपल्या जवळ पुष्कळ संपत्ति असतां विद्यादि साधनें कशास पाहिजेत; तर सांगतें एक. सर्व धनांहून विद्याधनच मोठें आहे, एक विद्या असली ह्मणजे तिच्या द्वारानें पाहिजे तें साध्य करितां येतें; व जें काम पुष्कळ द्रव्य खर्चूनही होत नाहीं, तें विद्येच्या योगानें सहज होतें. ह्याविषयीं तुला एक कथा सांगतें. पूर्वी कैलासपर्वताचेठायीं श्रीशंकर असतां तेथें कुबेर येता झाला. मग गोष्टी बोलतां बोलतां विद्या श्रेष्ठ कीं धन श्रेष्ठ ह्यावर उभयतांचा संवाद चालला. कुबेर ह्मणे धन श्रेष्ठ; शंकर ह्मणे विद्या श्रेष्ठ. मग धनाच्या श्रेष्ठपणाविषयीं कुबेराचा दुराग्रह पाहून, शंकरानें आपल्या गळ्यांतील वासुकीनामक सर्पास आज्ञा केली कीं, तूं भूतळीं जाऊन विबुधनामक नगरास वेढा देऊन, आपल्या विषाच्या योगानें तें प्रदीप्त करावें. मग आज्ञेप्रमाणें तो तेथें जाऊन नगर जाळूं लागला. तेव्हां मोठा आकांत झाला.

मग त्या नगरच्या राजानें कांहीं सैन्य त्या सर्पावर पाठविलें; पण तें ही पळून माघारें आलें. तेव्हां राजानें आपल्या वीरांस उत्तेजन येण्या करितां, आपल्या भांडारांतील हिरे, माणकें, वगैरे सर्व संपत्ति अंगणांत उपसून, पर्वतासारखे ढीग केले; आणि ते त्यांस दाखवून ह्मणाला, वीरहो, ह्या समयीं जो या संकटाचा परिहार करील त्यास हें सर्व द्रव्य व अर्धराज्यही देईन. तथापि कोणीही त्या सर्पा पुढें जाण्यास धजेना. शेवटीं निरुपाय होऊन राजा लोकांस ह्मणाला, बाबानो, आतां माझ्यानें तुमचें रक्षण करवत नाहीं. तुह्मी पाहिजे तसें करा. मग त्या नगरांत एक विद्वान् ब्राह्मण होता, त्यानें पुढें होऊन आपल्या मंत्रसामर्थ्यानें सर्पास तेथून उठवून लाविलें. नंतर श्रीशंकरानें त्या नगरांत भस्म टाकून, एका क्षणांत तें सर्व नगर होतें तसें केलें. तेव्हां विद्येच्या श्रेष्ठपणाविषयीं कुबेराची खात्री झाली. ही व अशाच दुसऱ्या पुष्कळ कथा सांगून त्या देवीनें राजपुत्राचें मन विद्याभ्यासाकडे वळविलें.

काव्य ७५
२२
काव्य ८३

॥ श्रीगजानन ॥

## ॥ श्लोक ॥

ज्याचीं पादरजें सदा सुखविती ब्रह्मादि ज्या सेविती ॥
ज्यातें आठवितां क्षणें निरसती त्या विघ्नराशी किती ॥
भावें भाविक भक्त ज्यासि नमिती तैं कार्य आरंभिती ॥
ज्याचें मंगल नाम हो गणपती मी वंदितों त्याप्रती ॥१॥
प्रार्थोनी तुज मागतों शिवसुता विघ्नें लया पाववीं ॥
माझीया वदनें रसाळ चरितें तूं मोरया गाववीं ॥
भ्रांतीतें निरसोनियां सकलही दे स्फूर्ति ह्या बुद्धिला ॥
हेतू जो धरिला मदीयमतिनें तो पाववीं सिद्धिला ॥ २ ॥

जें कां करूं नच शके अचि तें कराया ॥
घे धांव हा जडमती जगदेकराया ॥
द्यावा प्रसाद शरणागत किंकरातें ॥
लावीं प्रभो धरुनियां सुपथीं करातें ॥ ३ ॥

## ॥ आर्या ॥

आतां सरस्वती मी ॥ करितों जोडून हात तुज नमन ॥
वद काव्य मन्मुखानें ॥ कीं जें बहु रंजवील सुजनमन ॥४॥

निर्भय तवाश्रयें कवि ॥ करिती वर्णार्णवांत केलीला ॥
निधिहरिहरांसहि तुझी॥ नकळे त्रैलोक्यचालके लीला॥५॥

॥ श्लोक ॥

वेदादिकांहि न तुझा गुणपार लागे ॥
तो पामरास तरि देवि कसा मला गे ॥
जीचा अतर्क्य महिमा त्रिजगीं नमाये ॥
त्या वर्णवेल तुजला मज केंवि माये ॥ ६ ॥
मागे धरोनि बहु छंद नये करातें ॥
स्नेहाळ माय पुरवी तरि लेंकरातें ॥
माझ्या तसेंचि पुरवोनि मनोरथांतें ॥
माते मुखें सुरस गे वदवीं कथांतें ॥ ७ ॥

॥ आर्या ॥

कर जोडुनियां माझें ॥ सकळांही सज्जनां असो नमन ॥
काय उणें मज आतां ॥ लीन तयांच्या पदीं असोन मन॥८॥

॥ श्लोक ॥

अहो प्रास विप्रास ह्या साह्य आतां ॥
करा येउनी ह्या चरित्रास गातां ॥
बहु त्रास मित्रांस होतो तुह्मांतें ॥
परी अन्यथा कार्य साधे न मातें ॥ ९ ॥

---

१ वर्ण समुद्रांत.

जरीकां ह्मणां आमुचें काम नाहीं ॥
कैसी सिद्धिला पावते कामना ही ॥
तुह्मीं साह्य केलें तया वामनाला[1]॥
तसा तूमच्या हाहि यावा मनाला ॥ १० ॥

## ॥ आर्या ॥

यापरि वंदुनि सकलां ॥ सांगतसें चरित आयका हो तें ॥
श्रीशरयूच्या तीरीं ॥ विजयपुर ह्मणोनियां नगर होतें॥ ११॥
त्या नगरीं राज्य करी ॥ परमानंदाख्य भूप शूरवर ॥
मोठा धार्मिक ज्याची ॥ कीर्ति पसरली जगांत दूरवर ॥ १२॥
होता दुर्जयनामें ॥ दुर्व्यसनी एक तनय राजास ॥
झाला दुःखद मोठा ॥ वाटे नसता तरी बरा जास[2] ॥ १३ ॥
विद्याकलादिकांतें ॥ कांहीं न करी प्रयत्न साधाया ॥
ऐसा निज पितयातें ॥ होइल सुत पात्र तो कसा धाया ॥ १४॥
अंतःपुरीं स्त्रियांसह ॥ बहु रुचला ज्याचिया मना वास ॥
लावील न कां ऐसा ॥ वडिलांच्या पुत्र डाग नांवास ॥ १५॥
जाती कुपथीं सुत तरि ॥ दुःसहचि तुह्मां न काय हो तात ॥
जातां तोंच सुमार्गी ॥ सर्वसुखाचे उपाय होतात ॥ १६ ॥
होतां वृद्ध सुताची ॥ राजा स्वमनांत काळजी वाहे ॥
हो जरठीं[3] पितरांच्या ॥ धनसुतचिंताच काळ जीवा हे॥ १७॥

---

१ वामन पंडितास. २ राजास. ३ म्हातारपणीं.

जो पढवी न सुतातें ॥ तो तच्छत्रुचि ह्मणूनये तात ॥
घातक निजात्मजाचा ॥ दोष तयाला ह्मणून येतात ॥ १८॥
जाणुनि सुनीति ऐसी ॥ सुपथीं लावावया निज सुतातें ॥
पंडित चतुर मिळविले ॥ केला बोध स्वयेंहि बहु तातें॥ १९॥
झालें सकल विफल तें ॥ त्यांतीं तो बहु पिता असुख पावे ॥
कांचावे न ह्मणे या ॥ चिंतापाशीं असे असु खपावे ॥२०॥
सचिवाधीन करुनि मग ॥ राज्य वनीं जाय तो तप कराया ॥
आराधी दुर्गेतें ॥ दुःखद त्वत्ताप सर्वहि हराया ॥ २१ ॥
सोसुनि वनीं हिमातप ॥ तर्पुनि जठराग्नि पर्णरसपानें ॥
तिष्ठुनि एक पदावरि ॥ केलें अत्युग्र त्या तप नृपानें ॥२२॥
मासांतीं प्रगटुनियां ॥ देवि ह्मणे भागलास बा साधो ॥
वर ईप्सित वर आतां ॥ कार्य तुझें राजसत्तमा साधो ॥२३॥
पाय नमुनि राय ह्मणे ॥ काय वद उपाय अंबिके वरदे ॥
जेणें सुपथीं मत्सुत ॥ लागे हा गे अभीष्ट मज वर दे ॥२४॥
देवि ह्मणे खगरूपें ॥ येउनि तुझिया स्वयेंच बा धामीं ॥
बोधुनियां त्वत्तनया ॥ पळविन अज्ञानरूप बाधा मी ॥२५॥
होऊन सारिका मग ॥ ती गेली राजमंदिरा देवी ॥
पक्षी लक्षुनि सुंदर ॥ भूपज निज मंदिरीं तिला ठेवी ॥ २६॥
तेथेंचि मनुजवाणी ॥ बोलुनियां बोध करुनि नृपजास ॥
लावी सुपथीं ती मग ॥ पढवी विद्या अनेक नृप जास॥ २७॥

---

१ शीतोष्ण. २ तृप्तकरून. ३ घे. ४ इच्छिलेला.

श्री-ग्रं-८७

सांगे विविध कथा ती ॥ सन्मार्गी नृपसुतास वळवाया ॥
त्यांतील एक सुरसा ॥ गातों मी बुधजनांस कळवाया॥ २८॥

## ॥ दिंड्या ॥

असो पूर्विल हा कथाभाग झाला ॥
तसा सारांशेंकरुनि वर्णियेला ॥
पुढें येथोनी मुख्य भाग आला ॥
बुधांहीं तो पाहिजे पाहियेला ॥ २९ ॥
वृत्तकुसुमांची काव्यरूप माला ॥
करुनि आवडि म्यां अर्पिली तुह्मांला ॥
ठाव मुख्यत्वें करुणरसा केला ॥
नसे बहुधा श्रृंगाररसमय आला ॥ ३० ॥
कथा दाविल हे सुधेचीच गोडी ॥
सुखाची तें पावाल सर्व जोडी ॥
करा सावध निज मनोवृत्ति थोडी ॥
ह्मणुनि सुज्ञां शिवराम हात जोडी ॥ ३१ ॥

## ॥ आर्या ॥

देवी ह्मणे नृपसुता ॥ त्यागीं दुर्व्यसन सर्व बापा हें ॥
लाविल तुझ्या कुळाला ॥ अपकीर्तीचा कलंक बा पाहें॥ ३२॥
झाला तोचि स्वकुला॥ भूषवि जो आपुल्या गुणेंकरुन ॥
नातरि या भवचक्रीं॥ जनन न ते कवण पावती मरुन॥ ३३॥

भूतलवरीं चहुंकडे ॥ गाजतसे कीर्ति आज रायाची ॥
तत्सुत तूं मूढ असा ॥ लाज असावी तुला जरा याची ॥ ३४ ॥
सुगुणी पुत्र सुजाया ॥ जोडिति फळ नर करोनि सुतपा हें ॥
नरकीं निज पितरांतें ॥ घाली जन्मोनि मूर्ख सुत पाहें ॥ ३५ ॥
त्वत्तात जरठ तूंही ॥ शस्त्रास्त्रज्ञानहीनचि असा रे ॥
ऐसें ऐकुनि घाला ॥ राज्यावरि शत्रु घालतिल सारे ॥ ३६ ॥
यास्तव यत्नें आधीं ॥ विद्यासंपन्न नृपकुमारा हो ॥
ज्ञानार्क प्रगटुनि मनिं ॥ ठाव न अज्ञानमय तमा राहो ॥ ३७ ॥
जिंकुनि विवेकखड्गें ॥ आलस्य प्रथम शत्रु घातकर ॥
बा कीर्तिश्री जोडुनि ॥ त्रैलोक्यामाजि धन्य तात कर ॥ ३८ ॥
स्त्रीविषय परम घातक ॥ दशमुख सेवून यासचि बुडाला ॥
भक्षुनि आरोग्यातें ॥ पावेल कसा गदार्त चिबुडाला ॥ ३९ ॥
अजरामरवत्प्राज्ञें ॥ विद्याश्रीचा न यत्न सोडावा ॥
धर्माचरणीं सन्निध ॥ कल्पुनि मृत्यूस धर्म जोडावा ॥ ४० ॥
ह्मणसी विद्या असुगम ॥ कैसें करवेल साध्य तीस मज ॥
संतत पथ क्रमुनि नर ॥ दुर्गम गिरिशिरहि पावती समज ॥ ४१ ॥
दुस्तरभवार्णवांतुनि ॥ विद्यानौका सदा जनां उत्तरी[1] ॥
श्रममात्र आतंरास्तव ॥ मागे ऐसी दुजी नसे सुतरी ॥ ४२ ॥
विद्येनें भूषित हो ॥ वस्त्राभरणीं तसा न नरकाय ॥
पशुसम विद्येवांचुनि ॥ वांचुनि भूभारभूत नर काय ॥ ४३ ॥

---

१ उतारा करितां.

विद्येस मान लोकीं ॥ मिळतो नपवे कदा तसा धन तें ॥
विद्येसमान लोकीं ॥ ह्या अन्य न जीवनार्थ साधन तें ॥ ४४ ॥
विद्याधन वर ह्मणती ॥ बा इतर धनीं दुजें न जापरिस ॥
याअर्थी सुरस कथा ॥ कथितें ती नृपवरात्मजा परिस ॥ ४५ ॥

## ॥ श्लोक ॥

ज्या कैलासनगीं धरोनि गिरिजा अंकावरी जो बसे ॥
कंठीं वासुकिसर्प भूषण शिरीं गंगा जयाच्या वसे ॥
ज्याचें नाम मुखीं सदैव जपतां जाती लया आपदा ॥
भेटे येउनि राजराज[1] सहसा त्या शंभुला एकदां ॥ ४६ ॥
आलिंगोनि सख्यास बैसवि करें ईशान दिव्यासनीं ॥
बोले अर्थद धन्य मी तुज शिवा पाहोनियां लोचनीं ॥
गोष्टी बोलत बैसले उभयतां सप्रेम नानापरी ॥
विद्या कीं धन थोर तेथ करिती संवाद ते यावरी ॥ ४७ ॥

तेव्हां धनाधिप शिवास ह्मणे विलोकीं ॥
बापा धनासम न थोर दुजें त्रिलोकीं ॥
विद्यादिसाधन धनार्थचि या करीती ॥
संपादिती जन तयास अनेक रीती ॥ ४८ ॥

जयाचे घरीं नांदते संपदा ही ॥
तयाला जगीं मानिती लोक दाही ॥

---

१ कुबेर.

बहू तो शहाणा बहू तो कुलीन ॥
तयाच्यापुढें सर्वही लोक लीन ॥ ४९ ॥

कोणी पुसे न पदरीं जरि हेम नाहीं ॥
निर्द्रव्यता असुख दारुण दे मना ही ॥
कांताहि लेखिति पतींस तृणासमान ॥
कोठेंच नाहि तरि निर्धनिकास मान ॥ ५० ॥

अनेकांपरी योजुनी साधनांतें ॥
मनीं वांछिती सर्व एका धनातें ॥
धनप्राप्तिच्या वेष्टिलें वासनांहीं ॥
धनावांचुनी शांति जीवास नाहीं ॥ ५१ ॥

धनाकारणें त्यागुनी पुत्रदारा ॥
विदेशीं पडे हिंडणें दारदारा ॥
धनीच्यापुढें होउनी दीनवाणें ॥
सदा बुद्धिमंतांसही ये रहाणें ॥ ५२ ॥

धनाकारणें कष्ट देऊन जीवा ॥
करावी जना लागते नीचसेवा ॥
धनप्राप्तिला यत्न लागे उदंड ॥
धनासाठिं ये भोगणें देहदंड ॥ ५३ ॥

धनासाठिं जे मित्र ते शत्रु होती ॥
धनासाठिं या बंधुही प्राण घेती ॥
धनाकारणें सर्व मानाभिमान ॥

मा-मोगल्ये
८७

धनाकारणें घेति कापून मान ॥ ५४ ॥
जनीं सर्वही लोभ याचा करीती ॥
हवी नातरी कांसया चाकरी ती ॥
धनाकारणें सर्व लागे पसारा ॥
धनावांचुनी व्यर्थ संसार सारा ॥ ५५ ॥
धनाचीच कांता धनाचेचि पुत्र ॥
धनाचेमिसें सर्वही प्रीतिपात्र ॥
धनें लाभतें इच्छिलें सर्वकांहीं ॥
धनायेवढें थोर कांहींच नाहीं ॥ ५६ ॥

॥ साक्या ॥

शंभु ह्मणे सखया तुज झाली संगति नित्य धनाची ॥
ह्मणउनि वाटे ऐसी भ्रमली तुझिया वृत्ति मनाची ॥ ५७ ॥
चंचल धनसंपदा कदाही एकेठायिं न राहे ॥
करुनि पलायन शोकसागरीं सहसा बुडवि नरा हे ॥ ५८ ॥
वाहे निशिदिनिं धनी काळजी रक्षाया धनराशी ॥
ढकली दुष्कृतकूपीं धन हें करुनि मदांध नरासी ॥ ५९ ॥
दहनावांचुनि मना निरंतर जाळितसे धनचिंता ॥
ऐसी धनगति सखया ऐकें विद्यामहिमा आतां ॥ ६० ॥
तस्कर जें कां लुटों न शकती साध्य नहो नरनाथा ॥
बंधु जयाचा भाग न मागति शिणवि न भारें माथा ॥ ६१ ॥

व्यय करितांही वृद्धिच पावे संतत सन्निध राहे ॥
ऐसें सर्व धनांहुनि उत्तम बा विद्याधन आहे ॥ ६२ ॥
विद्या दे विनयास विनय तो दे पात्रत्व नरासी ॥
पात्रत्वें धन धनें धर्म तो पावे मग सुखराशी ॥ ६३ ॥
विद्यायोगें मिळे चतुरता चतुराईनें मान ॥
ज्यातें लोकीं नसे मान तो मानव पशूसमान ॥ ६४ ॥
विद्या संगें निघे प्रवासीं साह्य करी मनुजातें ॥
न विसबे पळही संरक्षी माय जसी तनुजातें ॥ ६५ ॥
मनुज पाहतां केवळ भूचर परि बैसोनि विमानीं ॥
विद्यायोगें गमन निराळीं केलें सुगम तयांनीं ॥ ६६ ॥
जो लक्षावधि कोस पसरला खोल जयाचें पाणी ॥
ऐसा सिंधुहि विद्यायोगें केला सुतर तयांनीं ॥ ६७ ॥
विद्यासामर्थ्येंच नरांनीं पावक सेवक केला ॥
पवन पुढें कर जोडुनियां ये मारितांच हांकेला ॥ ६८ ॥

## ॥ श्लोक ॥

आंगीं तरुणपण कांतिहि दिव्य जाला ॥
कीं जन्म तोहि सुकृतें सुकुळांत झाला ॥
विद्येविणें नर असाहि न तो विराजे ॥
निर्गंध किंशुक तया उपमेस साजे ॥ ६९ ॥

---

१ मुलातें. २ आकाशीं. ३ पळस.

ग्रं. क्र. ८१
ना.
ना. मे.

बहू सोयरे धायरे मित्र लोकीं ॥
परी संकटीं एक नाहीं विलोकीं ॥
सुखासाठिं ते सर्व आले मिळोनी ॥
विपत्काळ येतांच जाती पळोनी ॥ ७० ॥
असे मित्र विद्या जरी मानवातें ॥
त्रिलोकीं उणें काय आहे तयातें ॥
असो संपदा त्या नसो वा दसोडी ॥
तरी साह्य दे त्यास विद्या न सोडी ॥ ७१ ॥
जें द्रव्य वेचुनिहि काज कदा न हो तें ॥
विद्याबळें सुकर सर्वहि जाण होतें ॥
वा अन्यथाच जरिकाय गमे तुला हें ॥
कांहीं चरित्र तुज दाविन आज पाहें ॥ ७२ ॥

## ॥ दिंड्या ॥

असें सांगुनि सखयास उमानाथें ॥
झणी कंठांतुनि काढिलें फणीतें ॥
करी आज्ञा ईशान काय त्यातें ॥
ह्मणे येथुनि जाइजे भूतळातें ॥ ७३ ॥
विबुधनामें तें नगर असे जेथें ॥
भद्रबाहू नृप राज्य करी तेथें ॥

---

१ दशी. २ झडकर.

वासुकी तूं वेढोनि त्या पुरातें ॥
विषाग्नीनें मग पेटवीं तयातें ॥ ७४ ॥

॥ श्लोक ॥

मद अमित धनाचा जो तया राजयाला[1] ॥
हरुनि कुतुक कांहीं दाखवूं आज याला ॥
हरु मदहि फणीचा या मनीं हेंचि आणी ॥
ह्मणुनि अहिस तेथें पाठवी शूलपाणी ॥ ७५ ॥
आज्ञेस ह्या प्रभुचिया परिसोनि घाला ॥
घालावयास नगरावरि तो निघाला ॥
ये भूतळाप्रति पुरावरि अंतरिक्षीं ॥
राहोनियां कुतुक तो क्षणमात्र लक्षी ॥ ७६ ॥
होतें समग्र पुर विस्तृत कोस बारा ॥
ज्यामाजि हो अमित जीवगणांस थारा ॥
जेथें सुखें विविधवर्ण वसे प्रजा ती ॥
पश्वादि नांदति तशा बहु जीवजाती ॥ ७७ ॥

॥ दिंडी ॥

भोंवतालीं उपवनें शोभताती ॥
जातिमालतिच्या ज्यांत विविध जाती ॥
मधुर द्राक्षांचे घोंस लोंबताती ॥
भ्रमर प्याया रस जेथ झोंबताती ॥ ७८ ॥

---

१ कुबेरास.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

## ॥ श्लोक ॥

केळीं आम्रफळें असंख्य पनसें जंबीर सीताफळें ॥
दाडिंबें बदरीफळें पपनसें निंबें बरीं पोफळें ॥
होतीं रामफळें सुपक्क सुरसें तैसींच तीं जांबळें ॥
नानाजाति फळें तरूंवरि असीं ओथिंबलीं तुंबळें ॥ ७९ ॥
कितिक हरितवर्णीं तांबडीं एक काळीं ॥
विविधऋतुज ऐसीं ती फळें एककाळीं ॥
असति बहुत यत्नें त्या नगीं राखियेलीं ॥
नसतिल मघव्यानेंही तसीं चाखियेलीं ॥ ८० ॥
अश्वत्थ निंब वटवृक्षहि ते विशाल ॥
नारेळ ताल नभचुंबित तेंवि शाल ॥
होते कदंब तरु आणिक चंदनाचे ॥
शिख्यादि[1] ज्यांवरि मुदें[2] खगवृंद नाचे ॥ ८१ ॥
आरक्तवर्ण बहु ते फुलले अशोक ॥
तत्काळ खेद हरिती करिती अशोक ॥
येतो प्रफुल्लित सुपुष्पतरूंस वास ॥
जेथें पिकादि करिती सुखरूप वास ॥ ८२ ॥
कोठें पांचसहाखणी नवखणी कोठें असीं मंदिरें ॥
तारा जेंवि नभांगणीं चमकती तैसींच तीं सुंदरें ॥

---

१ मोर आदिकरून. २ आनंदें.

शेषाकार विचित्र पंक्तिरचना धाता स्वयें जे करी ॥
शोभा ते अनुपम्य तेथिल कसी वर्णावया ये तरी ॥८३॥
शृंगारिलीं मणिमयें मणिकें शिवाचीं ॥
तैसीं गणेशरविपार्वतिकेशवांचीं ॥
आंतील रत्नमय भाग असोनि यांचे ॥
जाती नभा कळस भेदुनि सोनियाचे ॥ ८४ ॥
स्फटीकांच्या भिंती मणिमय उभे स्तंभ बरवे ॥
निळे काळे गोरे कितिक दिसती गार हिरवे ॥
सुवर्णांचीं द्वारें वरि जडित पाचा मिरविती ॥
नृपाच्या गेहांची नपवतिच भा कोटिरवि ती ॥ ८५ ॥
विद्यालयें विविध नाट्यकलार्थ जेथें ॥
वेदश्रुतींसहि तसा बहु मान तेथें ॥
सद्धर्मशास्त्रपठणार्थ अनेक शाला ॥
जातील तीं कुपथि पौरमनें कशाला ॥ ८६ ॥

## ॥ सवाई ॥

रूपवत्या नव त्या नगरींतिल लाजविती बहु त्या रतिला ॥
दुर्घट तत्स्वरुपादिकवर्णन येल कसें कविभारतिला ॥
अंगचि पाहुनि दंग अनंगहि हो मग आन न कां नर तो ॥
लक्षिति ज्या निज नेत्रकटाक्षिं पडे क्षितिलागिंच पामर तो ८७

---

१ तरुण. २ दुसरा.

## ॥ श्लोक ॥

होती निरिच्छाहि न जीं नकोशीं ॥
रत्नें अशीं त्या बहु रत्नकोशीं ॥
सोन्यारुप्याच्या गिरितुल्य रासी ॥
तेथें उणें काय महीवरासी ॥ ८८ ॥

वा जीमूत तसाचि जो निज जनां पाजी कृपाजीवना ॥
राजीवाक्ष अशा स्त्रिया सुतहि ते राजी जयाच्या मना ॥
वाजीवारणसंघही झुलति त्या गाजी नृपाळापुढें ॥
मां जी ती करि दास्य ज्या सदनि त्यामाजी उणें कां पडे॥८९॥

द्वारावतींत हरि तो स्वयमेव राहे ॥
तत्कांतिचें नवल यास्तव काय आहे ॥
दुर्बुद्धि नाथ जरिकां नसता तियेसी ॥
लंका हळूहळु सरी करिती इयेसीं ॥ ९० ॥

लंकेतें रचितां उणीव विधिला कांहीं गमे राहिली ॥
कौशल्यानुभवार्थ हे मग दुजी निर्मोनियां पाहिली ॥
झाली प्राप्त तपोबळेंकरुनियां ते रावणाला भली ॥
हे जाणों उरली अपार सुकृतें ते या नृपा लाभली॥९१॥

नभीं राहे पाहे कुतुक बहु तो साप रमला ॥
ह्मणे जाळूं ऐशा पुरिस तरि कैसा पर मला ॥

---

१ मेघ. २ लक्ष्मी.

शिवाची ते आज्ञा इस न गणितां कोण तरला ॥
असें ध्यानीं आणी क्षितिस लवलाहीं उतरला॥ १२॥
वेढुनी मग तया नगरातें ॥
तो वमे प्रबळ नाग गरातें ॥
पूर्ण मध्यदिवसासचि घाला ॥
येरिती स्थिरचराकरि आला ॥ १३ ॥
फणी फार तो लांबवी आपणातें ॥
पुरद्वारिं आणोनि ठेवी फणांतें ॥
पुरी शेपुटें वेष्टिली त्या विखारें ॥
जिवां रोधिलें आंत ऐशा प्रकारें ॥ १४ ॥
धरी देह तो पर्वतप्राय सर्प ॥
विषाच्या बळाचा जया फार दर्प ॥
जणूं अंजनीपुत्र लंकापुरातें ॥
करी दीप्त तो दीप वा कापुरात ॥ १५ ॥
अति निकट पुराच्या पूर्वभागीं गृहें तीं ॥
प्रथमचि विषवायुस्पर्शनें पेटघेती ॥
त्वरित मग गृहींचीं माणसें त्या पळालीं ॥
इतर बहु तयांच्या भावतालीं मिळालीं ॥ १६॥
कोणी धांवुनियां प्रदीप्त सदनांबाहेर घे अंबरें॥
यत्नें रक्षिति पात्रभूषणहि ये हातास जेंजें बरें ॥

---

१ विषातें.

कोणी जाउनि निद्रितांस उठवी काढी दुजा लेंकरें ॥
गोष्ठीं बंधनमुक्त एक करि जीं होतीं गुरें वांसरें॥ ९७॥
ह्मणे एक गेहांत धांवोनि जाळें ॥
नका व्यर्थ भाजोनि घेऊं कपाळें ॥
अहो आयका राहुंद्या सर्व आधीं ॥
पळा नातरी होय जीवास आधी ॥ ९८ ॥
असें वारितो एक राहे दुजा तो ॥
तिजा फार लोभी त्वरें आंत जातो ॥
धरे येतसे तों कडाडोनि वाडा ॥
करी सर्वही बोलण्याचा निवाडा ॥ ९९ ॥
सदनिं झुरपळोनी घाबरा एक झाला ॥
तडफडतचि कष्टें शीघ्र बाहेर आला ॥
गडबड तयिं भूईं बापुडा फार लोळे ॥
त्वरित असुहि सोडी पांढरे होति डोळे ॥ १०० ॥
तयाची जे कांता बसुनि निज कांताजवळि ते ॥
रडे फोडी माथा फिरफिरुनि नाथा कवळिते ॥
ह्मणे स्वामी गेलां त्यजुनि अबलेला तरि कसे ॥
असा कांहीं धन्या मजकडुनि अन्यायहि नसे॥१०१॥
हा रोष केला तरि आज कांगा ॥
अन्याय झाला तरि काय सांगा ॥

कांहींतरी हो पतिराय बोला ॥
कां हो असा राखितसा अबोला॥ १०२ ॥
किंवा जाउनियां प्रदीप्त सदनामाजी बहू भागलां ॥
विश्रामार्थ महीतळीं घडिभरी डोळा असे लागला ॥
पुष्पांच्या पहुडे सदा मृदुलशा शेजेवरी काय हा ॥
आहे योग्य पडावया क्षितितळीं धूळीवरी काय हा॥ १०३॥
कीं वाचाळ सदा प्रिया प्रियवचां मागे असी हावरी ॥
टाकोनी वरिली सुशील सुखदा निद्रा दुजी नोवरी ॥
कीं कांहीं वदलें कठोर ह्मणुनी हा रोष केला असा ॥
कैसा अंत तरी पहाल इतुका भारी कृपाळू असां ॥ १०४॥
कीं द्यावें प्रिय जें अपूर्व मज तें आलें असें अंतरी ॥
तें नाहीं क्षितिमंडळीं ह्मणुनियां शोधार्थ गेलां वरी ॥
झाला शोध पुरे नको प्रियतमा सारें मला पावलें ॥
लाहें मी अनुपम्य सौख्य तुमचीं हीं सेवितां पावलें॥ १०५॥
अहा दैवा कैसी विपरित असी गोष्ट घडली ॥
कुऱ्हाडी आकाशींहुनि अवचितां केंवि पडली ॥
करूं काई आई मज उदरिं दे ठाय जगती ॥
असारीं संसारीं पतिविण सती व्यर्थ जगती ॥ १०६ ॥
धडधडां बडवी मग ऊर ते ॥
नयनिं वाहति गा जळपूर ते ॥
फिरफिरोनि शवासह बोलते ॥

वदवती न तिचे मज बोल ते ॥ १०७ ॥
तीव्रता अति भुजंगगराची ॥
राख त्या करितसे नगराची ॥
जाहली सकल एकच घाई ॥
शब्द तैं उठति हायअगाई ॥ १०८ ॥
घेवोनियां कितिक ते जन कुंभ हातीं ॥
यत्नें जळें अनल तो विझवूं पहाती ॥
त्यांची तयापुढति काय असे कथा रे ॥
आगीसमीप जन एकहि तो न थारे ॥ १०९ ॥
पवनही अति दारुण ऊठला ॥
सकळिकांस तदा पळ सूटला ॥
रडति वृद्धतरूण समस्तकीं ॥
कितिक हाणिति भूमिस मस्तकीं ॥ ११० ॥
बडविती तयिं ऊरहि बायका ॥
कितिक त्यांतच बोलति आयका ॥
सुजवितां तरि नेत्र रडून कां ॥
फुकट शोकभरें चिरडूंनका ॥ १११ ॥
एक ते सदय लेंकुरवाळी ॥
पोळतां शिशु तया कुरवाळी ॥
धांवते ह्रदयिं त्यास धरोनी ॥
जाय तो तडफडोनि मरोनी ॥ ११२ ॥

पळे एक पाठीस तों मूल लागे ॥
ह्मणे काय टाकोनि जासी मला गे ॥
नको एकली जाउं मातें सवें घे ॥
ह्मणोनि त्वरें जाय मातेस वेंघे ॥ ११३ ॥
ह्मणतसे तंव एक कसें करूं ॥
विसरलें सदनांतचि लेंकरूं ॥
बहुत तांतडिनें पळतां अहो ॥
स्मृतिच ती मज बाइ कसी न हो ॥ ११४ ॥
कळेना जितें राहिलें कीं जळालें ॥
करूं काय गे धैर्य माझें गळालें ॥
पहायास बाळास जाते ह्मणून ॥
न तैशाहि त्या पावकातें गणून ॥ ११५ ॥
स्वगेहासि ये मागुती माय जेव्हां ॥
दिसे दीप्त सारेंचि तें तीस तेव्हां ॥
पडे भूइं ते मोकली धाय माय ॥
शिशूचें तिच्या दुःख पोटीं न माय ॥ ११६ ॥
ह्मणे एक कोठें नसे सासुबाई ॥
कळेना असे कीं नसे सासु बाई ॥
असी घाबरी स्वांतरीं ते असून ॥
दुजी ते ह्मणे जाहली काय सून ॥ ११७ ॥

---

१ समान.

Vadhawkar

ह्मणे एक आहे गृहीं वृद्ध आई ॥
करूं मी कसें काय आतां अगाई ॥
दुजी तों मुलीचा ह्मणे थांग नाहीं ॥
असा मांडिला घोळ पौरांगनांहीं ॥ ११८ ॥
शिशू एक मारी स्वमातेस हांका ॥
दुजा तों ह्मणे जाहला काय काका ॥
तिजा बोलतो दाखवीं माय मामा॥
रडे दे ह्मणे प्यावया एक आमा ॥ ११९ ॥
गृहा लागतां आग एका पळालीं ॥
मुलें माणसें सर्व तीं वेगळालीं ॥
शिशू एक माडीवरी जो निजेला ॥
चुकोनी गृहामाजि तो राहियेला ॥ १२० ॥
असे पावकें वेष्टिली सर्व जागा ॥
अशामाजि तो जाहला बाळ जागा ॥
सभोंवार तों देखिला जाळ जेव्हां ॥
भयें धाकलें धाकलें बाळ तेव्हां ॥ १२१ ॥
अधोभागीं चोहींकडुनि जयिं वन्ही धडकला ॥
नये जाया माडीवरिच शिशु तेव्हां अडकला ॥
तयातें काढाया कितिक जन ते यत्न करिती ॥
न ये एकातेंही परि चढुनि जायाहि वरती ॥१२२॥
खिडकिमाजि उभा मग राहुनी ॥

शिशु रडे जननीप्रति बाहुनी ॥
जन समस्त अधःस्थळिं पाहती ॥
नयनिं अश्रु ढळाढळ वाहती ॥ १२३ ॥

अगे माउली धांव गा धांव ताता ॥
जळालों कसें मी करूं काय आतां ॥
ह्मणे हांक मारोनियां मायबापा ॥
न मागेन मी आजपासून पापा ॥ १२४ ॥

न मागेन खाऊ नको साय मातें ॥
रुसेंना कधीं आजपासून माते ॥
अहो घ्या मला बाहुटे तो उभारी ॥
तया देखतां कष्टले लोक भारी ॥ १२५ ॥

## ॥ आर्या ॥

करुणस्वरें अशापरि ॥ बालक तो ह्मणुनि अंबअंब रडे ॥
फोडी स्ववत्सदुःखें ॥ मायहि ते गायसीच हंबरडे ॥ १२६ ॥
धांवा जनहो रक्षा ॥ बालक हें पोळलें पहानाकीं ॥
जातोसि काय वत्सा ॥ मज टाकुनि एकला अहा नाकीं १२ ॥

## ॥ श्लोक ॥

अहो वांचवा माझिया आज बाळा ॥
करूं काय मी हाय आतां कपाळा ॥

असें बोलतां मूर्छना तीस आली ॥
पडे गेह तेंही कडाडोनि खालीं ॥ १२८ ॥

## ॥ दिंड्या ॥

असो यापरि चेतला ज्वाळमाळी[1] ॥
मंदिरें तीं पेटती आळआळी ॥
फार घाबरले पौर तया काळीं ॥
ह्मणति होतो कां प्रलय हा अकाळीं ॥ १२९ ॥
हेर धांवति सांगती नरवरासी ॥
घोर सर्पें जी वेष्टिलें पुरासी ॥
शीर आणुनि ठेविलें गोपुरासीं[2] ॥
विषाग्नीनें जाळितो मंदिरांसी ॥ १३० ॥
अनलयोगें जें सदन दीप्त होतें ॥
अन्य गेहां झणि पेटवी अहो तें ॥
साह्य तेथें होऊन महावातें ॥
कितेकांतें लाविलें मृत्युपंथें ॥ १३१ ॥
जळें पावक तो नये आंवराया ॥
सर्व गेला आमुचा आंव[3] राया ॥
आज कैंचे जी प्राण हे उराया ॥
काळ आला जणुं अंत हा कराया ॥ १३२ ॥

---

१ अग्नि. २ पुरद्वार. ३ हिंमत.

असी वार्ता भूपाळ परिसतां ही ॥
सिद्ध वेगें करविलें सैन्य कांहीं ॥
ह्मणे वीरांनो उठा करा घाई ॥
विचाराची तों वेळ असेना ही ॥ १३३ ॥
असा मायावी दुष्ट कोण आहे ॥
मत्पुराचा जो नाश करूं पाहे ॥
धरा मारा आपटा कुटा हाणा ॥
नका सोडूं तत्काळ हरा प्राणा ॥ १३४ ॥
गोपुरासीं चालली तदा सेना ॥
धूमयोगें धड मार्गही दिसेना ॥
जवळि येतां विषताप सोसवेना ॥
मनीं कोणाच्या धैर्य तें वसेना ॥ १३५ ॥
धांव घेती ते वीर वेगळाले ॥
कितिक ठायींच्याठायिं ते गळाले ॥
जीव घेउनियां पाठि जे पळाले ॥
विषाग्नीनें त्यांतून बहु जळाले ॥ १३६ ॥

## ॥ साक्या ॥

होती नृपंजा[1] त्या भूपाच्या पदरीं अगणित सेना ॥
परि त्या उरगापुढती जाया कोणी वीर धसेना ॥ १३७ ॥

---

१ हे राजसुता.

संकट देखुनि दूरि पळाली धैर्यें वीरजनांचीं ॥
त्यांतें आकळुंपाहे नृप तो दावुनि आस धनाची ॥ १३८॥
सांगुनियां सेवकांस वेगें उघडुनियां भांडारें ॥
उपसुनियां रचविलें आंगणीं रायें धन तें सारें ॥ १३९ ॥
हेम हिरे मौक्तिकें माणिकें ह्यांच्या गिरिसम राशी ॥
चंचल तेजें झळकति सकळहि सौदामिंनि[1] ते जैशी॥१४०॥

## ॥ श्लोक ॥

ह्मणे भूप ऐका तुह्मी वीर सारे ॥
बहु क्षोभला नाग हा तों असा रे ॥
परी ताप हारील जोकां जनांचा ॥
असे स्वामि हो आज तो ह्या धनाचा ॥ १४१ ॥
दावोनियां आपुलिया बळातें ॥
जिकील जो वीर तया खळातें ॥
देईन राज्यार्धहि त्यास जाणा ॥
कोणी उठा स्वार्थ मनांत आणा ॥ १४२ ॥
रत्नांकडे मागुति वीर पाहे ॥
जो तो मनीं दुःखित होत आहे ॥
सोडी परी एकहि तो न ठाया ॥

1 वीज.

कोणासही धीर न ये उठाया ॥ १४३ ॥
येना दयालेश भुजंगमातें ॥
जाळोनि टाकी स्थिरजंगमातें ॥
तेव्हां मनीं तो बहु भी रसांप ॥
राहों न दे कांहिच धीर साप ॥ १४४ ॥

॥ पद ॥

( गड्यांनो कृष्णगडी आपुला याचालीवर )

न सुचे परिहारक गोष्टी ॥ राजा गजबजला पोटीं ॥ धृ० ॥
धडधड धडके विषवन्ही ॥ टिकेना तयापुढें कोणी ॥
झाली नगरीं बहु हानी ॥ जळाले अगणित बा प्राणी ॥
झाली एकचहाकाटी ॥ ॥ राजा० ॥ १ ॥
ह्मणती एक उठा धांवा ॥ करिती हायहाय देवा ॥
जन्मांतरिचा अघठेवा ॥ केवीं फळला अजि दैवा ॥
झाले जन ते बहु कष्टी ॥ ॥ राजा० ॥ २ ॥
कडकड गेहें कडकडती ॥ जळतां भूमिवरी पडती ॥
त्या घोर विखारापुढती ॥ नचले कोणाची चढती ॥
करि विषवन्हीची दृष्टी ॥ ॥ राजा० ॥ ३ ॥
शिवपूजनिं अंतर पडलें ॥ मन परकांतेवरि जडलें ॥
किंवा साधूंतें छळिलें ॥ कीं गोब्राह्मणांसि वधिलें ॥
झाली ह्मणुनि असी गोष्टी ॥ ॥ राजा० ॥ ४ ॥

---

१ राजा.

आठवि भूप पूर्वकर्मा ॥ चुकलों काय ह्मणे नेमा ॥
धांवें जगदीशा रामा ॥ देई भेटी शिवरामा ॥
येई सत्वर जगजेठी ॥ ॥ राजा० ॥ १४५ ॥

## ॥ आर्या ॥

झाला निरुपाय तदा ॥ सर्व स्वकुलाभिमान सोडून ॥
होऊन दीन राजा ॥ बोले पौरांस हात जोडून ॥ १४६ ॥
निज रक्षणार्थचि अहो ॥ देती धनभाग तो प्रजा राजा ॥
परि आहें शक्त तुह्मां॥या व्यसनाब्धींत मी न ताराया॥ १४७॥
जें जें केलें झालें ॥ विफळचि तें तें तुह्मां सकळ कळतें ॥
काय करूं मन माझें॥पाहुनि तुमच्या श्रमास कळकळतें १४८
जाळील आजि पावक ॥ मद्वपु परि तेंहि मज नसे परवा ॥
परबा रे या तुमच्या॥आयकवेनाच मज विलापरवा॥ १४९॥
बा परिसा रे सारे ॥ आतां यत्न न दिसे दुजा बरवा ॥
जें मानेल जयातें ॥ तें करुनी प्राण आपुले उरवा॥ १५० ॥

## ॥ दिंडी ॥

नृपाळाच्या परिसोनि अशा बोला ॥
दुःख झालें बहु अंतरीं जनांला ॥
असो येथिल वृत्तांत असा झाला ॥
अनळ गेहें यासीत जवळि आला ॥ १५१ ॥

## ॥ श्लोक ॥

साहित्य ज्या करिति चोंहिकडून वारे ॥
कोणासहि प्रबळ पावक तो न वारे ॥
तें तापलें बहु महीतल तीव्र तापें ॥
वाटे घडे प्रलय नागविषप्रतापें ॥ १५२ ॥
हळुहळु अनळें त्या पश्चिमे चाल केली ॥
अगणित सदनांची राख होऊन गेली ॥
जवळि दहन पावे येउनी तो जसा रे ॥
पुढतिपुढति तैसे धांवती जीव सारे ॥ १५३ ॥

## ॥ दिंड्या ॥

दिसे तापावांचोनि ठाय जेथें ॥
घेति आश्रय जाऊन सर्व तेथें ॥
पुरार्धाचा जाहला असा नाश ॥
पथीं धांवति ते लोक जीवितांश ॥ १५४ ॥
निज स्कंधीं वाहोनि वृद्ध ताता ॥
एक धांवे घेवोनि एक माता ॥
मना ज्याच्या जें प्रीय फार वाटे ॥
तेंचि घेउनि धांवती लोक वाटे ॥ १५५ ॥
भानु होता मध्यान्हि पूर्ण आला ॥

---

१ जीविताची आशा आहे ज्यांस असे.

अशा समयीं आक्रांत असा झाला ॥
वसंताचा होतसे फार ताप ॥
तयामाजी हा अग्निचा प्रताप ॥ १५६ ॥
तृषायोगें व्याकूळ जीव झाला ॥
शरीरातेंही घर्म फार आला ॥
तप्त भूमीवरि पोळताति पाय ॥
नसे कोणाचाही तया उपाय ॥ १५७ ॥
धूमयोगें धुंदल्या दिशा दाही ॥
पळायातें धड मार्ग दिसेना ही ॥
एक सर्वांची हांक तैं उडाली ॥
पुसे कोणातें कोण अशा वेळीं ॥ १५८ ॥

## ॥ श्लोक ॥

एका गृहांत तरुणी सुकुमार साची ॥
होती नवप्रसवली सतरा दिसांची ॥
देखोनि तो दहन फार समीप आला ॥
घेऊन तीस झणि कांत सवें निघाला ॥ १५९ ॥
पोटीं धरोनि लघु बालक ते शुभांगी ॥
आली पथीं परम दुःखित अंतरंगीं ॥
नेतां असा शिशु पडे श्रम फार तीतें ॥
बोले ह्मणोनि पति मंजुळ भारतीतें[1] ॥ १६० ॥

---

[1] वाणीतें.

तूं सत्वरी चाल पुढें सये तों ॥
मागून मी घेउन यास येतों ॥
ऐकोनि ऐसें ललना निघे ते ॥
लोकांसवें धांव पथांत घेते ॥ १६१ ॥
झडकरी करिं वस्त्रहि आंवरी ॥
पदर सांवरिते वरचेवरीं ॥
सुतनु धाकलि धाकलि मानसीं ॥
चपळ ते पळते हरणी जसी ॥ १६२ ॥
ऐशापरी धांवत दूर आली ॥
ते गोरटी श्रांत अपार झाली ॥
आंगीं तियेच्या बहु घर्म आला ॥
म्लानत्वही ये मुखपंकजाला[1] ॥ १६३ ॥
विश्रांतिला मग उभी क्षणमात्र राहे ॥
येतो पती ह्मणुन मार्ग विलोकिताहे ॥
धांवा पळा असि उठे तंव थोर हांक ॥
सारेच तैं पळति पावुनि फार धाक ॥ १६४ ॥
दाटी पथीं फारच हो जनांची ॥
इच्छा समस्तां निज जीवनाची ॥
एकापुढें धांवति एक वेगें ॥
हे भागली राहिलि दूर मागें ॥ १६५ ॥

---

१ मुखकमळास.

मनीं धाके हांकेसरसि मग भारीच पळते ॥
उभी राहे पाहे फिरफिरुनि मागें चपळ ते ॥
असी जातांजातां अडखळुनि रंभोरु पडली ॥
महावातें कीं ते डळमळुनि रंभा उपडली ॥ १६६ ॥
आधींच होती सुकुमार बाळी ॥
जे धांवतां श्रांत अशांत झाली ॥
ऐशांतही आपटतां कपाळीं ॥
ते भीरु सोडी असु तेचिकाळीं ॥ १६७ ॥
तों पावला सशिशु नाथ तया सतीचा ॥
देखे असा तयि अचेतन काय तीचा ॥
आलों ह्मणे जवळि दूर नसें पहा हा ॥
कां जाहलीस सखि मूर्च्छित तूं अहाहा ॥ १६८ ॥
मग तिला कुरवाळुनियां करें ॥
पवन शीतळ घालुनि अंबरें ॥
उठवि मारुनि हांक घडीघडी ॥
परि न ते नयनांवुज ऊघडी ॥ १६९ ॥
न्याहाळितां फिरफिरोनि मुखा सतीच्या ॥
तो आठवोनि करि शोक गुणांस तीच्या ॥
नाहीं कठोर वदलीस कदा मुखानें ॥
होतों ह्मणे क्रमित काळ तुझ्या सुखानें ॥ १७० ॥

---

१ केळी सारख्या मांड्या आहेत जिच्या असी. २ भितरी.

गृहीं यावें जेव्हां श्रमुनि वहु बाहेरुनि सदा ॥
निवावें देखोनी तव वदनचंद्रासचि तदा ॥
प्रिये एकाएकीं त्यजुनि तरि कां गेलिस मला ॥
तुझ्या चित्ता कैसा प्रियतर दुजा लोक गमला॥ १७१॥

कीं श्रांत कोमल तुझी तनु फार झाली ॥
यालागि गाढ तुज सुंदरि झोंप आली ॥
मार्गीं असें न निजणें वरवें अगे हें ॥
आलीं पहा जळत फार समीप गेहें ॥ १७२ ॥

अहा जाये कायेसम मृदु न कार्पास तुझिया ॥
कसी गे तापातें क्षणतरि सहासील अजि या ॥
रुसोनी कां मौना धरिसि तरि माझ्यासह सये ॥
नको रोषूं प्राणेश्वरि जवळि बैसोनि हंस ये॥ १७३॥

स्वकरिं घे धर ऊठ मुलास ये ॥
कसि नसे ममताच तुला सये ॥
क्षुधित कोमल हें निजलें करीं ॥
न धरि निष्ठुरता निज लेंकरीं ॥ १७४ ॥

धात्या विचित्र करणी तरि कांवि केली ॥
गेली प्रिया त्यजुनि ते मज आज गेली ॥
झालें मला त्रिजग शून्यच कीं अहाहा ॥
जाळी न आज मज पावक कां महा हा ॥ १७५॥

ऐसें वदे अनल तोंचि समीप आला ॥

स्वप्राणलोभ तयिं ऊठ ह्मणे तयाला ॥
टाकी तसाचि मग भूमिवरील काय ॥
गेला पळोनि ह्मणि दूरि करील काय ॥ १७६ ॥
वडिलवडिल मार्गी एकठायीं मिळाले ॥
विविध चतुर युक्ती योजिती वेगळाले ॥
कठिण समय भारी काय कैसें करावें ॥
ह्मणति पद निदानीं श्रीहरीचें स्मरावें ॥ १७७ ॥
ह्मणे एक हो ध्यानिं हे गोष्ट आणा ॥
नव्हे नाग हें क्षोभलें भूत जाणा ॥
ह्मणे एक हो कोपली हे भवानी ॥
ह्मणोनी असी होतसे थोर हानी ॥ १७८ ॥
हे बैसलीसे पसरून आ जी ॥
यासील हें पूर समय आजी ॥
नाहींच ह्या गोष्टिस वानवा हो ॥
आधीं महाकालिस शांतवा हो ॥ १७९ ॥
रुद्र तोहि नवसूं अकरावा ॥
या उठाच न विलंब करावा ॥
क्षेत्रपाळहि तसा नवसा हो ॥
कीं न घात नगरांत असा हो ॥ १८० ॥
योजोनि ऐशापरि युक्ति चार ॥

ते शाहणे जों करिती विचार ॥
तों देखती आग समीप आली ॥
घाई पळाया तयिं फार झाली ॥ १८१ ॥
करी श्वान वाजी अजा आणि गाई ॥
बहू धाकलीं वांसुरें ही अगाई ॥
पशू हे किती धांवती आळआळी ॥
कितेकांस जाळीतसे ज्वाळमाळी ॥ १८२ ॥
कितिक हंबरडे बहु फोडिती ॥
तटतटां निज बंधन तोडिती ॥
करुनि यत्न नये सुटतां किती ॥
असु तदा स्थळिंच्यास्थळिं टाकिती ॥ १८३ ॥
प्राणी असंख्य शिरती विवरीं लपाया ॥
तेथेंहि त्यां विषनिदाघ[1] करी अपाया ॥
पोळोनि कीटक सपक्षअपक्षजाती ॥
दाहें तया तडफडोनि मरोनि जाती ॥ १८४ ॥
ठाव भूतळिं[2] नसोनि दडाया ॥
पाहती खग नभांत उडाया ॥
जाति पोळुनि तदा गगनींच ॥
प्रेतरूप पडती मग नीच ॥ १८५ ॥
वापीकूपसरादिकांत कढती तापोनियां जीवनें ॥

१ विषाचा दाह. २ खालीं.

तैं मीनादिक दीन तीं जलचरें वा त्यागिती जीवनें ॥
ऐसा थोर अनर्थ वासुकि करी सांगूं किती ताप ते॥
त्राता आज दुजा न पौर ह्मणती बा धांव सीतापते॥१८६॥

अगाई अगोई अहाहा अहाहा ॥
कसा ईश्वरा क्षोभ केला महा हा ॥
अहाहा अभागी जळालों कपाळा ॥
दया आमुची कां नये रें कृपाळा ॥ १८७ ॥
वनीं रक्षिल्या जेंवि गोपाळगाई॥
तसी माउली धांव कृष्णे अगाई ॥
सख्या आमुचा कष्टला जीव भारी ॥
किती अंत रे पाहसी कैटभारी ॥ १८८ ॥

## ॥ दिंड्या ॥

असो झाला आकांत असा भारी ॥
एक होता त्या पुरीं ब्रह्मचारी ॥
सकलविद्यासंपन्न सदाचारी ॥
सदा योगाभ्यासांत काल सारी ॥ १८९ ॥
चित्त ठेउनियां उमानाथपायीं ॥
षड्रिपूंतेंही मथुनियां उपायीं ॥
सुकृत जेणें बहु जोडिलें तपांहीं ॥
चंद्रशेखर हें नाम त्यास पाहीं ॥ १९० ॥

विदित होतां हें वृत्त त्या द्विजाला ॥
मनीं विस्मय खेदही फार झाला ॥
त्यजुनि आश्रम मग विप्र तो निघाला ॥
त्वरें भूपतिच्या मंदिरास आला ॥ १९१ ॥

## ॥ ओव्या ॥

दंडकमंडलु शोभे हस्तीं ॥ तेजें जया उणा गभस्ती ॥
ऐसा तपोधन पुण्यमूर्ती ॥ राजसदनीं प्रवेशला ॥ १९२ ॥
विप्र मानोनि ईश्वरासमान ॥ राजा करी साष्टांगनमन ॥
ह्मणे थोर संकटीं जाण ॥ आजि पडलों द्विजवर्या ॥ १९३ ॥
न कळे दुष्कृत घडलें कवण ॥ तेणें क्षोभला नारायण ॥
ह्मणोनियां व्यसन दारुण ॥ ऐसें आजी ओढवलें ॥ १९४ ॥
विप्र ह्मणे गा नृपा सुमती ॥ धैर्य न सांडिजे येतां विपत्ती ॥
विपरित काळाची हे गती ॥ निरसेल बा क्षणार्धें ॥ १९५ ॥
तवाश्रयातें अवलंबून ॥ केलें सुखें म्यां कालक्रमण ॥
स्नानसंध्यादिकर्मं संपूर्ण ॥ निर्विघ्नपणें साधिलीं ॥ १९६ ॥
ऐसा तुझा प्रभाव थोर ॥ परी संकट उदेलें घोर ॥
तयाचा करीन परिहार ॥ यथाशक्ति राजेंद्रा ॥ १९७ ॥

## ॥ श्लोक ॥

दावोनियां निज तपोबळ सर्पराया ॥

जाऊन आजि हरितों खळदर्प राया ॥
हारीन दुःखभयशोकहि या जनांचा ॥
वा निस्तरीन अजि ताप तुझ्या मनाचा ॥ १९८ ॥
रक्षो तयांस कमलापति वा पिनाकी[1] ॥
रक्षो सुरांसहित तो मघवांपि[2] नाकीं ॥
प्रत्यक्ष कालहि असेल तरी तयातें ॥
दंडीन जो करि विशंक[3] महानयातें[4] ॥ १९९ ॥

## ॥ दिंड्या ॥

अशा बोलें तो तोषला रसाप ॥
असो आतां दंडोनि मत्त साप ॥
समस्तांचा हारील विप्र ताप ॥
पहा विद्येचा भूपजा प्रताप ॥ २०० ॥

## ॥ श्लोक ॥

घेवोनियां त्वरित अंजलिमाजि पाणी ॥
मृत्युंजयांघ्रिकमलांस मनांत आणी ॥
प्राशी सवेंचि अभिमंत्रुनि त्या जळाला ॥
तो कांसया मग गणील विषानळाला ॥ २०१ ॥
ऐशापरी तो द्विज सिद्ध झाला ॥

---

१ शिव. २ मघवा-अपि. ३ शंकारहित. ४ महा-अनयातें.

त्या वासुकीसन्निध शीघ्र आला ॥
राहे पुढें जोडुनियां स्वपाणी ॥
बोले तयातें मग नम्र वाणी ॥ २०२ ॥
कां जाळिसी बिषधरा तरि तूं पुरा या ॥
नाहींच काय करुणा तुज सर्पराया ॥
अन्याय ह्या जनिं तुझा वद काय केला ॥
यासावया ह्मणुनि त्यां असती भुकेला ॥ २०३ ॥
तूं कंठभूषण पहा गिरिजापतीचें ॥
औदार्य थोर बहु याहि महीपतीचें ॥
देतोसि दुःख तरि काय ह्मणून यातें ॥
सोडूंनये बुधजनीं सहसा नयातें ॥ २०४ ॥
केले जनीं असति कांजरि मंतु[1] जे जे ॥
आतां क्षमा करुनि ह्यां असुदान दीजे ॥
तारीं प्रजा व्यसनमुक्त करीं नृपा हें ॥
आहे तुला उचित बा स्वविचार पाहें ॥ २०५ ॥
हें घोर कर्म तुज फार अयोग्य बापा ॥
दाटून कां उगिच आचरितोस पापा ॥
प्रार्थीतसें जुळुनि हे तुज हात दोनी ॥
रक्षीं पुरा बहुत काय वृथा वदोनी ॥ २०६ ॥
विप्राच्या वचनास या परिसतां तो वासुकि क्षोभला॥

---

१ अपराध.

माझ्याही गरलासमोर उरला हा कोण ऐसा भला ॥
ऐसा विस्मय मानसीं करि फणीजातिस्वभावें तरी ॥
सोडी मागुति घोर दारुण विषज्वाला द्विजांगावरी॥ २०७॥
विप्रें मागुति तीनवेळ अहि तो बोधोनियां प्रार्थिला॥
ऐकेना तरि तो विचार पहिला सांडीचना आपुला ॥
झाला क्ष्वेडबळें[1] प्रमत्त न गणी शब्दें जरी दापिला॥
तेव्हां तो द्विज चंद्रशेखर भला क्रोधानळें व्यापिला २०८

चेष्टा किशोरसम[2] दाविसि काय मातें ॥
सांभाळ आज निरखीं मम विक्रमातें[3] ॥
गर्जोनि यापरि भयंकर उग्र वाणी ॥
धांवोनि तो अहिशिरावरि लात हाणी ॥२०९॥
खवळि कोप तयाहि भुजंगमा ॥
परम घातक जो स्थिरजंगमा ॥
बहु भयंकर काढुनियां फणा ॥
पुढति घे सरसावुनि आपणा ॥ २१० ॥

येतो साप डसावया पुढति हें देखोनि त्या ब्राह्मणें ॥
मातें काय तुवां अपाय करिजे हांसोनि त्यातें ह्मणे ॥
टाकी मंत्रुनि दर्भ एक मग त्या व्याळावरी तो झणी ॥
तेणें कुंठित जाहली गति पुढें येऊंशकेना फणी ॥२११॥
बैसला अहिमनीं धसका रे ॥

---

१ विषबळें. २ पोरासारख्या. ३ पराक्रमातें

टाकुनी तरि मुखीं फुसकारे ॥
मागुती निज फणांस उभारी ॥
दाखवी भय भुजंगम भारी ॥ २१२ ॥
जरी येववेना पुढें पामरा या ॥
तरी दावितो व्यर्थ चेष्टा मराया ॥
असें देखतां धांवला क्षिप्र वेगें ॥
पुन्हाही शिरीं हाणिली लात रागें ॥ २१३ ॥
असें जेव्हां आलें द्विजबळ भुजंगास कळुनी ॥
त्वरें वेढे काढी सरसर पुराचे उकलुनी ॥
ह्मणे आतां येथें बसुनि गति होईल न बरी ॥
ह्मणोनी कैलासीं पळुनि मग गेला झडकरी॥२१४॥

## ॥ साक्या ॥

यापरि हारुनि गर्व नृपाचा आणिक त्या भुजगाचा ॥
काय करी ईशान आयकें नायक जो त्रिजगाचा २१५
टाकुनि वेगें भसित पुरींचा पावक शांत करोनी ॥
निमिष नलगतां उठवी जे जे गेले जीव मरोनी ॥२१६॥
स्थिरचर मागुति निर्मुनि सारें धनेंदा कौतुक दावी ॥
अनंतबळ भगवंत काय बा त्याची शक्ति वदावी ॥२१७

---

१ भस्म. २ कुबेरास.

## ॥ श्लोक ॥

वर्तलें नवल एक विशेष ॥
वर्णितां नुरवि तें कवि शेष ॥
व्यंगकाय अति रुग्ण असे जे ॥
नीजले मृत महीतळसेजे ॥ २१८ ॥
स्पर्शतां भसित त्यां सहसा रे ॥
दिव्य देह तयिं पावति सारे ॥
ठावही मनिं नुरे असुखातें ॥
त्यांचिया न वदवेचि सुखातें ॥ २१९ ॥
बरे होतिना कोटि केल्या उपाय ॥
असे मोडके जाहले नीट पाय ॥
अचक्षूहि जे जाहले ते पहाते ॥
अकर्णांसही कर्ण आले अहा ते ॥ २२० ॥
बहू बोलके जाहले सर्व मूक ॥
न राहे तदा व्यंग कांहीं अमूक ॥
शिवाच्या कृपेमाजि तें व्यंग काय ॥
त्वरें जाहले सर्व अव्यंगकाय ॥ २२१ ॥
पाहे दर्पण एक घेउनि तदा आश्चर्य भावी मनीं ॥

---

१ दिव्यदेही.

जन्मापासुनि सव्यें नेत्र नव्हता आला ह्मणे कोठुनी ॥
झाला विस्मित मानसीं दचकला हा मीच किंवा कसें ॥
संदेहीं पडला असा चतुरही आश्चर्य झालें असें ॥२२२॥

स्वकांताचें जेव्हां युवति निरखी रूप नेंव[2] तें ॥
ह्मणे आंगीं गोरेपणहि इतुकें बाइ नव्हतें ॥
ह्मणावा हा भर्ता न तरि मुख तैसेंच दिसतें ॥
परी हें कोठोनी सरळ इतुकें नाक असतें ॥२२३॥

त्वरित सकळ ऐसें होय जें जें जळालें ॥
असुख जनमनींचें सर्व तेव्हां पळालें ॥
दिवस सकळ पौरीं मानिला पाडवा[3] तो ॥
करिल मग उणें कां त्या पुरीं लाडवा तो ॥२२४॥

## ॥ कटाव ॥

आनंद करिति नगरीं सारे जन ते ऐसारे ॥ ध्रु० ॥ झाली नारिनरांची दाटी, लगबग तेव्हां सकळां मोठी, ह्मणति पावला तो जगजेठी, वैकुंठींचा भक्तांसाठीं, ह्मणुनि देखिला हा दिन दृष्टी, मायलेंकरां पडल्या गांठी, उठाउठी शिशु धांवोनि मिठी, घाली निज मातेच्या कंठीं, परस्परांच्या होतां भेटी, लडिवाळपणें बालक पोटीं, धरुनि मास घे चुंबन ओंठीं, कांता निज कांतांप्रति भेटति,

१ दावा. २ नवें ३ वर्षप्रतिपदा. ४ धाईनें.

पितासुतसुता, भगिनीभ्राता, श्वशूरशालक, मामाचुलता, भाचाभाची, बहुलोभाचीं, संसारीं सोयरीं सुखाचीं, चटसारीं तीं लगट करुनियां मिळति एकवट, परस्परांतें मग बाहोनी, कवटाळुनि कडकड बाहूंनीं, आवडि डोळांभरि पाहोनी, तोष वाटला, कंठ दाटला, आनंदानें ऊर फाटला, विरहसिंधु तो सर्व आटला, प्रेमाचा मनिं पूर लोटला, उत्सव तुज तो सांगूं काई, होय सुखाची बहु सवंगाई, वत्सांप्रति देखुनि लवलाहीं, धांवति गाई-झाली घाई, पशू अन्यही आनंदति बहु, वृक्षांवरि बहु लक्षावधि तैं पक्षि मिळुनि निज पक्षांहीं दृढ आलिंगुनियां परस्परांतें, करिति शब्द ते, किलकिलकिल कोकिला सुस्वरें गायन करिती, नाचति मोरें लहान थोरें, अशाप्रकारें अखिल जीवजंतु त्या पुरींचे हर्षति बा रे॥आनंद० ॥ १ ॥

भाविक करिती भगवद्भजनें, द्विजसंतर्पण देवतार्चनें, नामस्मरणें, गीतापठणें, गुढ्या तोरणें आणि निशाणें, घरोघरीं उभविति हर्षानें, स्त्रिया देति ब्राह्मणांसि वाणें, आणिक दानें परोपरीचीं, कोणी दाणे सोनें नाणें, ज्याच्या चित्ता जें जें माने, तें तें अर्पुनियां सन्मानें, द्विज तोषविले, अत्यानंदें झाले वेडे, आटिव पेढे ताटि भरोनी वांटिति पांटी भरुनि शर्करा, वाटिवाटि एकेका, मोठी

दाटि जनांची, कोणी न करी गणति धनाची, आनंदानें वृत्ति मनाची, तल्लिन होउनि ह्मणति उगवला सुदीन हा रे! ॥ आनंद० ॥ २ ॥

जिकडेतिकडे जयजयकारें, भरलि अगारें, झडति नगारे, डुमडुमडुमडुम एकच गजरें, वाजंत्रें वाजती सुस्वरें, आनंदभरें धांवुनि येती, शोभा देखायास अमर ती, फार दाटले अंबर वरती, मंडपांत जन दाटति बहु किति थाट वदूं तुज, मध्यें नाचती वारवधू त्या, संगितांतही व्यंग नसे तिळ, मृदंग नादें दंग करिति मन, तकथोम्‌तकथोम् नाद ऊठती, धिलांग धुमकट, धिधिकिट धिधिकिट, गति त्रिवठ, अति बिकट ताल करताल वाजती, सारंग्यांसह सारमंडळें, सतारवीणा वाजति, मध्यें थैथैथैथै नाचतनाचत मृगनयना त्या, करनयनांचे हाव भाव बहु दावुनि नाना, करिति तनाना, ख्याल ध्रुपद पद गजल तराणा, तनोन्तनोन्तोन्तनदरनादिक, गीतें नाना, गाउनि सुस्वर ओढिति ताना, अंबरांत गंधर्व अंगनासहित विमानाबाहिर माना काढुनि टकमक कुतुक पाहती तेथिल सारें ॥ आनंद० ॥ ३ ॥ २२५ ॥

## ॥ आर्या ॥

शंभु ह्मणे वैश्रवणा[1] ॥ झालें कीं कुतुक देखिलें पुरतें ॥

---

1 हे कुबेरा.

नसतें विद्याधन जरि॥ तरि उरतें सांग काय गा पुर तें॥२२६॥
अमित धनत्यागेंही ॥ झालें जेंकां न काज राजातें ॥
विद्याबळेंचि निर्धन॥ विप्र करी आज राजराजा तें॥२२७॥
आग्रहचि तुझा पाहुनि ॥ पडलें इतुकें करावयास मज ॥
विद्याधनासम दुजें॥ नाहींच जगत्रयांत या समज॥२२८॥
विद्यामाता सदया ॥ बहु यत्नें साध्य जो करी तीतें ॥
रक्षी तया निरंतर ॥ पाहि विचारोंनि लोकरीतीतें ॥ २२९॥
ऐसी राजसुताप्रति ॥ सांगे नरवाणिनें कथा देवी ॥
ती अर्पुनि हरिचरणीं ॥ भावें शिवराम मस्तका ठेवी॥२३०॥

---

.हें कुबेरा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

समाप्त.

सज्जन प्रार्थना.

## ॥ आर्या ॥

हा काव्याऽमृत भेला चाखुनि गोडी पहा सुरसनांहीं ॥
घ्या मान्यकरुनि बुधहो जरि गमला फारसा सुरस नाहीं ॥ १ ॥
आहे सर्वस्वीं हा निर्दोष नसे मदुक्ति असि कांहीं ॥
दोष त्यागोनि गुण—ग्रहण करावें तथापि रसिकांहीं ॥ २ ॥
होता तसा पुढें म्यां केला स्वीकृति अहो करा याची ॥
ह्मणउनि शिवराम तुह्मां जोडुनियां उभय ही करां याची ॥ ३ ॥

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- | --- |
| ४ | ५ | पाबे | पावे |
| ६ | १७ | उत्तरी | उतरी |
| ७ | ९ | एकदां | एकदा |
| ९ | ३ | कांसया | कासया |
| १० | १२ | सिधुहि | सिंधुहि |
| १४ | ३ | मणिकें | सदनें |
| १४ | १२ | वेदश्रुतींसहि | वेदस्मृतींसहि |
| १६ | १४ | कापुरात | कापुरातें |
| १६ | १८ | भावताळीं | भोंवताळीं |
| १८ | २ | राखितसा | राखितसां |
| २४ | ४ | तों | तो |
| २५ | ९ | तों | तो |
| २७ | ११ | तेंहि | तेहि |
| ३५ | १० | कष्ठला | कष्टला |
| ३७ | १७ | कांसया | कासया |
| ३८ | ४ | बिषधरा | विषधरा |
| ४५ | ( टीप ) | हेंकुबेरा | हेकुबेरा |